स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे कार्यालय,
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्रमांक- २६१२९३२१/२६१२२८४६ ई-: मेल- commpat२०१८@gmail.com

जा.क्र.पतसंस्था/सआ/संचालक मंडळ निवडणूक पात्रता/सन २०२२ (651) दि. १५/०६/२०२२

## परिपत्रक

**विषय : नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या संचालक मंडळ निवडणूक पात्रतेबाबत.**

**संदर्भ** : १) या कार्यालयाचे जाक्र.ना.बँका/डी-४/ना.पत/संचालक पात्रता/०७ दि.१/९/२००७ रोजीचे परिपत्रक
२) अध्यक्ष, बळीराजा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. मंगळवेढा जि.सोलापूर तथा सदस्य, नियामक मंडळ यांचे पत्र दि.१/३/२०२२
३) महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ सभा दि.१०/३/२०२२ मधील निर्णय.

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे परिपत्रकाद्वारे राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना लागू करण्यात आलेल्या आदर्श उपविधीमध्ये संस्थेच्या संचालक मंडळाच्या पात्रतेच्या अटीमध्ये दुरुस्ती करण्यात आली होती. संचालक मंडळाच्या निवडणूकीत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सभासदाने संस्थेमध्ये स्वत:च्या नावाने संस्थेच्या कार्यक्षेत्रानुसार नमूद केल्याप्रमाणे ठेव रक्कम ठेवलेली असली पाहिजे, असे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

त्याप्रमाणे नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या आदर्श उपविधी क्र.४४ (१३) मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. संस्थेच्या संचालकांनी त्यामध्ये नमूद केलेप्रमाणे संस्थेत ठेव ठेवणेबाबत पूर्तता न केल्यास अशी व्यक्ती संचालक पदासाठी अपात्रता धारण करील, असे नमूद केले आहे. मात्र सदर ठेव किमान किती असावी, कोणत्या प्रकारची असावी व किती कालावधीसाठी ठेवणे आवश्यक आहे, याबाबत स्पष्टता नसलेमुळे संस्थांच्या निवडणूकीचे वेळी अर्ज भरण्याच्या दिवशी अशा व्यक्ती संस्थेमध्ये त्यांचे सेव्हींग खात्यावर रक्कम भरतात व निवडणूक निर्णय अधिकारी सेव्हींग रक्कम हीच ठेव रक्कम आहे, असे समजून अर्ज मंजूर करतात. सदरची बाब संदर्भ क्र.२ द्वारे या कार्यालयाचे निदर्शनास आणून दिलेली आहे. सेव्हिंग खात्यावरील रकमेचा 'ठेव' म्हणून संस्थेच्या उपविधीत उल्लेख नसावा, म्हणजे ज्यांना निवडणूकीमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांचा २ वर्षापासून तरी संस्थेच्या कामकाजाशी संबंध येईल. त्यामुळे संस्थेचे व्यवहारात भाग घेणारे सभासद 'संचालक' म्हणून निवडणूकीस पात्र होतील, अशी नियामक मंडळाचे बैठकीमध्ये चर्चा होऊन संस्थेच्या उपविधीत त्याप्रमाणे दुरुस्ती होणेबाबत संस्थांना सूचित करणेत यावे, असे ठरविणेत आले आहे.

त्यामुळे नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांच्या आदर्श उपविधी क्र.४४ (१३) मध्ये खालीलप्रमाणे तात्काळ दुरुस्ती करणेबाबत संस्थांना सूचित करणेत येत आहे.

"संस्थेचे संचालक म्हणून काम करणेस इच्छूक असलेल्या सभासदांनी निवडणूक नामनिर्देशनाचे दिवशी संस्थेत "मुदत ठेव (Fixed Deposit) ठेवणे बंधनकारक असेल. संस्थेत ठेवलेली मुदत ठेव संचालक मंडळाचा कालावधी संपण्यापूर्वी काढून घेतल्यास ती व्यक्ती सदर संस्थेवर संचालक म्हणून काम करण्यास अपात्र असेल."

71

तरी राज्यातील सर्व नागरी/ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांनी त्यांचे आदर्श उपविधीमध्ये वरीलप्रमाणे स्ती करणेबाबत कळविण्यात येत आहे. सर्व विभागीय सहनिबंधक/जिल्हा उपनिबंधक/तालुका/वॉर्ड/ सहाय्यक निबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील पतसंस्थांच्या ही बाब निदर्शनास आणून देऊन सर्व संस्था वरीलप्रमाणे उपविधी दुरुस्ती तात्काळ करुन घेतील, या सुचनांची अंमलबजावणी करावी.

**(अनिल कवडे)**
**अध्यक्ष, नियामक मंडळ**
**तथा सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे**

,

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन/लेखापरीक्षण) (सर्व विभाग)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक (वर्ग-१), सहकारी संस्था (सर्व )
४. अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापक, सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. (सर्व) (राज्य/जिल्हा/तालुका)
५. अध्यक्ष/व्यवस्थापक, ----------------- नागरी/ग्रामीण बिगरशेती पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.---------- ता.------- जि.-----------

माहितीस्तव :

१. मा.अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२ (सविनय सादर)
२. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. अपर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था/लेखापरीक्षण), मुख्यालय, पुणे
४. कार्यासन अधिकारी (माहिती व तंत्रज्ञान), मुख्यालय, पुणे - यांना संकेतस्थळावर त्वरीत प्रसिद्धीस्तव
५. धारिका संग्रही